# मेट्रो ३च्या मार्गिकेची चाचणी लवकरच होण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी) :**

कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३च्या चाचण्यांसाठी एक प्रोटोटाइप गाडी या महिन्याच्या अखेरीस मुंबईत दाखल होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे लवकरच मेट्रो मार्गिकेच्या चाचण्यांना सुरूवात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मेट्रो ३ च्या गाडीच्या चाचणीसाठी डिसेंबर २०२१ अखेर पहिली मेट्रो गाडी मुंबईत दाखल होईल, असे गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) सांगण्यात आले होते. मात्र मरोळ येथे उभारण्यात येत असलेल्या तात्पुरत्या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने डिसेंबरमध्ये गाडी मुंबईत दाखल होऊ शकली नाही. त्या नंतर यंदा मार्चमध्ये ही गाडी येईल असे एमएमआरसीतर्फे सांगण्यात आले होतो. मात्र हा मुहूर्तही हुकला होता. मेट्रो गाडी तात्पुरत्या कारशेडमध्ये नेण्यासाठी मार्गातील काही झाडांच्या फांद्या तोडाव्या लागणार आहेत. त्याला पालिकेडून परवानगी मिळण्यासाठी विलंब होत असल्याने गाडी मुंबईत दाखल होऊ शकली नाही. पण सध्यस्थितीत आंध्र प्रदेश येथील कारखान्यात गाड्या तयार आहेत. या महिनाअखेरीस या गाड्या मुंबईत आणण्यात येणार असल्याचे समजते. सुरुबातीस आरे येथे उभारलेल्या तात्पुरत्या मेट्रो कारशेडच्या जागेवर गाडी आणण्यात येणार आहे.

